# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
**परभणी-431402(महाराष्ट्र) भारत**


---

संदर्भ :- १. शासन परिपत्रक , सामान्य प्रशासन विभाग, समय/२०२०/प्र.क्र.३१/१८ दि.१६/०३/२०२०.
२. विद्यापीठ परिपत्रक क्र.अेपीआर-२ २०२० दि.१६/०३/२०२०.
३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, समय/२०२०/प्र.क्र.३१/१८ दि.२८/१०/२०२१.

विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांची
बायोमॅट्रिक प्रणालीवर उपस्थिती नोदविणे बाबत.

## परिपत्रक

जा.क्र.समय/२०२३/बायोमॅट्रिक/प्र.क्र.२८५/आस्था-७ 13713
दिनांक:- १७ /०८ /२०२३. 18

प्रकरणी, विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांची दैनंदीन कार्यालयीन उपस्थिती ही बायोमेट्रिक पध्दतीने नोंदविणेबाबत यापुर्वी विद्यापीठ परिपत्रकानुसार निर्देशीत करण्यात आलेले आहे,मात्र दैनंदीन कार्यालयीन उपस्थिती ही बायोमेट्रिक पध्दतीने नोंदविल्या जात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे,

सबब, याव्दारे पुनश्च सुचित करण्यात येते की, विद्यापीठातील कायम आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांची दैनंदीन कार्यालयीन उपस्थिती ही बायोमेट्रिक प्रणालीवरच नोंदविण्यात यावी, तसेच कार्यालय प्रमुखांनी त्यांचे अधिनिस्त अधिकारी/कर्मचारी कार्यालयात येतांना व कार्यालय सोडतांना त्यांची उपस्थिती बायोमेट्रिक प्रणालीवरच नोंदवत आहेत किंवा कसे याची खातरजामा करावी.

तसेच, दिनांक २१ ऑगस्ट २०२३ पासून केवळ बायोमेट्रिक उपस्थिती आधारेच वेतन देयके स्विकारले / अदा केले जातील, त्यामुळे उपरोक्त सूचनांचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

मा.कुलगुरु महोदय यांचे निर्देशानुसार..

(धिरजकुमार रा.कदम)
कुलसचिव

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता(कृषि) /संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/विद्यापीठ अभियंता, वनामकृवि परभणी यांना त्यांच्या अधिनस्त यंत्रणांना सूचित करण्यासाठी अग्रेषित.
२.सर्व कार्यालय प्रमुख/प्रभारी अधिकारी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
३.नियंत्रक,वनामकृवि,परभणी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी केवळ बायोमॅट्रिक उपस्थिती विचारात घेऊनच वेतन देयके स्विकारावीत प्रकरणी उपरोक्त निर्देशानुसार उचित कार्यवाहीस्तव.
४.प्रभारी अधिकारी तथा नोडल ऑफीसर,मध्यवर्ती संगणक केद्र, वनामकृवि परभणी यांना देवुन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
५.**प्रभारी अधिकारी, खर्च काढण्याची योजना,वनामकृवि** परभणी अंतर्गत योजनेमधील कृषि सहायक/इतर कर्मचारी यांना दिले गेलेले गावसमूहाच्या ठिकाणी उपस्थिती नोंदविण्याकरीता संबंधीत कर्मचारी यांनी मोबाईल मध्ये Note Cam अॅप डाउनलोड करून त्यामधून स्वत:चे फोटो घेवून उपस्थिती नोंदवावी, सदरची उपस्थिती ही लगतच्या पर्यवेक्षकीय अधिकारी यांनी Note Cam मधील फोटोवर असलेल्या उपस्थितीची /स्थळाची खात्री करून स्पष्ट शेरा/अभिप्राय नोदविण्यात येवून वेतन देयकासोबत सलग्न करावे.
६.मा.कुलगुरु महोदय, यांचे खाजगी सचिव यांना माहीतीस्तव.

(धिरजकुमार रा.कदम)
कुलसचिव